## यशस्वी गिरणी कामगारांना कागदपत्रे सादर करणेबाबत विशेष मोहिम तसेच पात्र अर्जदारांना देकारपत्र देण्यासंदर्भातील

# जाहिर निवेदन

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळामार्फत मुंबई मधील एकूण १८ बंद/आजारी गिरणींच्या जागेवर एकूण ६९२५ सदनिकांची सोडत दि. २८/०६/२०१२ रोजी काढण्यात आली. त्या अनुषंगाने सोडतीमधील यशस्वी अर्जदारांकडून दि.०१/१०/२०१२ ते ३१/१०/२०१२ या कालावधी मध्ये **मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, मुंबई** मार्फत कागदपत्र/दाखले/प्रमाणपत्र स्विकारण्यात आलेली आहेत.

ज्या यशस्वी अर्जदारांनी उपरोक्त कालावधीमध्ये पात्रतेसंदर्भात सादर करावयाची कागदपत्र बँकेमध्ये सादर केलेली नाहीत अशा सर्व अर्जदारांकरीता मुंबई मंडळामार्फत कागदपत्र सादर करणेकरीता विशेष मोहिम दि.१६/११/२०१२ ते दि.३०/११/२०१२ पर्यंत मुबई बँकेच्या फोर्ट शाखेमध्ये राबविण्यात येत आहे. यामध्ये खालील प्रमाणे अर्जदार कागदपत्र सादर करु शकतील.

१. ज्या अर्जदारांना मुळ प्रथमसुचना पत्र या कार्यालयाकडे परत आलेली आहेत अशा अर्जदारांची यादी म्हाडा संकेत स्थळ www.mhada.maharashrta.gov.in येथे प्रसिध्द करण्यात आली आहे. अशा अर्जदारांनी त्यांचे प्रथमसुचनापत्र मुंबई बँकेच्या फोर्ट शाखेतून स्विकारुन उपरोक्त कालावधी मध्ये कागदपत्रे सादर करावे.

२. ज्या यशस्वी अर्जदारांना गाळा वितरणाचे प्रथम सुचनापत्र अद्यापपर्यंत प्राप्त झालेले नाही किंवा म्हाडाकडे परत आलेली नाहीत अशा अर्जदारांनी मंडळाकडे पुराव्यांसह अर्ज करुन दुय्यम प्रत प्राप्त करुन उपरोक्त कालावधी मध्ये कागदपत्रे सादर करावे.

३. ज्या मुळ गिरणीकामगार / अर्जदार मयत असलेल्या अर्जदारांच्या वारसांनी कागदपत्र सादर केलेली नाहीत अशा अर्जदारांच्या वारसांनी उपरोक्त कालावधी मध्ये कागदपत्रे सादर करावे.

---

मा. उच्च न्यायालय यांचे आदेश क्र.PIL क्र.एल.७८/२०१२ दि.२६/०७/२०१२ नुसार कागदपत्र तपासणी मध्ये जे अर्जदार पात्र ठरले असतील अशा अर्जदारांची यादी टप्प्या टप्प्याने म्हाडा संकेत स्थळ www.mhada.maharashrta.gov.in येथे प्रसिध्द करण्यात येईल. अशा अर्जदारांच्या पात्रते विषयी काही आक्षेप असल्यास सदर यादी प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून १५ दिवसांचे आत योग्य पुराव्यांसह लेखीस्वरुपात नोदवावा. तद्नंतर प्राप्त झालेल्या आक्षेपांचा विचार केल्या जाणार नाही याची नोंद घेण्यात यावी.

सही/-
मुख्य अधिकारी
मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, मुंबई.